● गुरुवार, दि. ७ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १०३ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# लाडक्या बहिणीला पंधराशे ऐवजी मिळणार दोन हजार शंभर रुपये - बबनराव लोणीकर

## महायुतीची सत्ता आल्यास २५ लाख रोजगार निर्मित्तीचा वादा

**परतूर । प्रतिनिधी -** प्रत्येकास अन्न आणि निवारा प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्याचे महायुती चे असून वचन वृद्ध पेन्शनधारकांना महिन्याला १५०० वरून २१०० रुपये देणार असून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर होतील २५ लाख रोजगारनिर्मिती करून १० लाख विद्यार्थ्यांना दरमहा १०,००० रुपये विद्यावेतन महायुती सरकार देईल. या बरोबर च ४५,००० गावांत पांदण रस्ते बाधणार या सह अंगणवाडी आणि आशा सेविकांना महिन्याला १५,००० वेतन आणि विमा संरक्षण देणार असल्याचे प्रतिपादन देणार असल्याच प्रतिपादन परतूर विधानसभा मतदार संघाचे महायुती चे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. परतूर तालुक्यातील आनंदवाडी, खांडवीवाडी, श्रीष्टी, दैठणा, सिंगोना, श्रीष्टी वाहेगाव, माव, पाटोदा, येनोरा, हातडी, सोयंजना, वलखेड, बामणी आणी शेरवाडा या चौदा गावात महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मतदार संवाद दौरा केला याप्रसंगी गावागावात आयोजित बैठकीत मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते. परतुर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रचारार्थ आयोजित जनसंवाद बैठकीदरम्यान दौऱ्यात शत्रूघन कणसे, रमेश भापकर, संपत टकले, बद्रीभाऊ ढवळे, अशोकराव बरकूले, अंकुशराव बोबडे, संभाजी वारे, गजानन लोणीकर, रवी सोळंके, माजी सभापती वाघमारे शिवाजी पाईकराव यांची उपस्थिती होती.



या वेळी पुढे बोलतांना बबनराव लोणीकर म्हणाले की परतूर मतदारसंघातील तीनशे गावांना डांबरीकरणाचे रस्ते प्रत्येक गावात सिमेंट कॉँक्रिटीकरण चे रस्ते गावोगाव सांस्कृतिक सभागृह अनेक प्रशासकीय इमारती मागासवर्गीय मुलींसाठी परतुर व मंठा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वस्तीगृह न्यायालयीन इमारती परतुर मंठा येथे भव्य क्रीडा संकुल यासह शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग आरोग्याच्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी परतुर व मंठा या दोन्ही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र ३३ केव्ही १३२ केव्ही २२० केव्ही परतुर विधानसभा मतदारसंघात रस्त्याचा आणि विजेचे जाळ आपण निर्माण केलं असल्याचं यावेळी आमदार लोणीकर यांनी आवर्जून नमूद केलं.

परतूर तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी रु), वाटूर, आष्टी, श्रीष्टी व सातोना येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (२४ कोटी ८८ लाख) असा एकूण ८४ कोटी ८८ लक्ष रु निधी तर मंठा तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी), दहिफळ खंदारे व ढोकसाळ या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (१२ कोटी ४४ लक्ष), तर खोराड सावंगी व उस्वद प्राथमिक आरोग्य उपकेंद्रसाठी (१ कोटी १० लाख) असे एकूण ७३ कोटी ५४ लक्ष रु निधी. मतदारसंघात २ उपजिल्हा रुग्णालयासाठी १२० कोटी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३७ कोटी ३२ लाख तर २ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी १ कोटी १० लाख रुपये असा एकूण १५७ कोटी ४२ लक्ष रुपयांचा निधी आणला असल्याची माहिती दिली.

विमा न काढणे बँकेला पडले महागात!

## दहा लाखांची नुकसान भरपाई देण्याचा निर्णय

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील कुंभार पिंपळगाव येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेतील एका कर्जधारकाचा विमा काढला नसल्याने बँकेला दहा लाख ९०६ रुपेय नुकसान भरपाई तक्रारीच्या खर्चासह देण्याचा निर्णय ग्राहक आयोगाने दिला असल्याने विमा न काढणे बँकेला चांगलेच महागात पडले आहे. अॅड. महेश धन्नावत यांनी याप्रकरणी तक्रारदाराची बाजू मांडली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, कुंभार पिंपळगाव येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून गजानन कृषिसेवा कृपा केंद्राचे मालक दत्तात्रय दशरथ तौर यांनी व्यवसायासाठी २००९ पासून ९ लाख ७५ हजार रुपयांचे कर्ज रक्कम घेतली होती. दरम्यान दि. ०७ सप्टेंबर २०२१ रोजी पावसामुळे बँकेकडे तारण असलेल्या मिळकतीत जेथे तक्रारदाराचे स्टॉक ठेवण्यात आले होते. ज्यात खताचे बॅग होते. त्या सर्वांचे नुकसान झाले. व महसुल खात्याने त्याचा पंचनामा देखील केला होता. बँकेच्या निष्काळजीपणामुळे विमा काढला गेला नाही, त्यामुळे झालेल्या नुकासानासाठी बँक जबाबदार होती, मात्र बँक त्यासाठी नकार देत असल्याने शेवटी तक्रारदार यांनी अॅड. महेश धन्नावत यांच्या मार्फत ग्राहक आयोगाकडे दाद मागीतली. आयोगाने ही बाब लक्षात घेतली की, पावसामुळे खत खराब होण्यापूर्वी बँकेने विमा काढला नाही व पावसानंतर दि. १५ सप्टेंबर २०२१ रोजी विमा काढला तसेच अॅड. धन्नावत यांनी दिलेल्या राष्ट्रीय आयोगाच्या निर्णयाप्रमाणे गहाण मालमत्तेचा विमा उतरविणे ही बँकेचे जबाबदारी आहे. व आदेश दिले की, बँकेने तक्रारदार दत्तात्रय दशरथ तौर यांना रक्कम रु. १० लाख ९०६ रुपये नुकसान भरपाई व तक्रारीच्या खर्चासह द्यावे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील लोकांना न्याय मिळाल्याची बाब असल्याने दत्तात्रय तौर यांनी सांगीतले.

युवा आदर्श

## खेळी ...

राजपुत्रा जिंकू आणू
वरिष्ठांची नवी खेळी
ताटकळले रांगेमध्ये
निष्ठवंतांचे जाई बळी
दूर सारावे प्रतिस्पर्धी
धमकी वेळी अवेळी
मान्य करुनि घ्यायचे
रोखून बंदुकीची नळी
आयुष्य होई वाळवंट
उठत राहते वावटळी
परिसरात काही होवो
मुले आपले कवटाळी
सगे सोयरे साथ करे
सहन करत अनर्गळी
प्रवक्ते चालवे टकळी
बडबड व्यर्थ चावळी
परिवारात सत्ता फिरे
फुलत राही वंशावळी
नेता पुत्राच्या सोहळ्या
घाली मी जेवणावळी
नवस बोले जयासाठी
गर्दी भक्ताची राऊळी
उपवास करे कार्यकर्ते
चर्च मशिदी न् देवळी
सत्ता स्नुषा यावी घरां
नेतापुत्र बांधे मुंडावळी
विजयोत्सव करायला
जनता भोळी उतावळी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# विहिरीत पडलेल्या बिबट्याला जीवदान

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** विहीरीत पडलेल्या एका बिबट्याला वन विभागाच्या प्रयत्नाने बाहेर काढण्यात यश मिळाले असून या बिबट्यास सुरक्षित अधिवासात सोडण्यात आले आहे. याविषयी अधिक माहिती अशी की, भारज खुर्द (ता. जाफ्राबाद) शिवारात सोमवारी (ता. ४) रात्री शिकारीच्या शोधात असणारा एक बिबट्या विहिरीत पडला होता. त्याला सुखरुप विहीरी बाहेर काढुन वाचविण्यात वन विभागाला यश आले आहे. भारज खुर्द येथील शेतकरी रघुनाथ येडूबा तारू यांच्या गट नंबर २६ शेतातील विहीरीत हा प्रकार घडला. रात्रभर विहिरीतील विद्युत मोटारीच्या पाईपचा आधार घेवुन या बिबट्याने आपला जीव वाचवित रात्र विहीरीतच काढली. आज मंगळवारी (ता. ५) सकाळी नियमीतपणे विहीरीतील मोटार सुरु करण्यासाठी शेतकऱ्याने विहीरीत पाहिले असता तेथे बिबट्या पडला असल्याचे त्याच्या निर्देशनास आले. त्यामुळे त्यांनी गावाकडे धावत घेत सरपंच व तंटामुक्तीचे अध्यक्ष यांच्यासोबत पोलीस प्रशासन आणि वनविभागाला याबाबत घटनेची माहीती देण्यात आली. माहिती मिळताच वन परिमंडळ अधिकारी योगेश डोमळे यांनी वन परिक्षेत्राधिकारी कैलास नागरगोजे यांना कळविले घटनास्थळी पाठविले. दरम्यान, या बिबट्याला पिंजरा टाकून सुरक्षित बाहेर काढण्यात आले असून, त्यानंतर पशुधन विकास अधिकारी मनोजकुमार पांडे व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी त्याची आरोग्य तपासणी करुन सदर बिबट्याचे फिट सर्टिफिकेट देऊन त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्याचे पत्र दिले. ही कार्यवाही सूर्यकांत मानकावर यांच्या मार्गदर्शनाखाली सुदाम मुंडे, कैलास नागरगोजे, योगेश डोमळे, रेखा दुनगहू, श्री. राऊत, नवीन अली, समाधान कोल्हे, सुनीता सुरवसे, सोनु जाधव, पूजा धमाल, कृष्णा वाकोदकर, आनंद वरशील, सचिन शिंनगारे, महादेव कळमकर, सुदाम राठोड, श्रीमती मगरे, कैलास कदम, भालेराव साहेब, वाघमारे साहेब, जयाजी शिंगारे, भाऊ व्यवहारे श्री. भाटसोडे, राजू तुपे, कारभारी जाधव शाम गव्हाणे, मोमीन तडवी यांनी पुर्ण केली. पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना सहकार्य केले.

विधानसभा निवडणुक; कायदा सुव्यवस्थेसाठी पोलीसाची विशेष दक्षता

# शहरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून नजर - करिश्मा चौधरी

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी शहरात विविध ठिकाणी सीसीटिव्ही कॅमरे बसविण्यात आले आहेत. निवडणुकांसह सण उत्सवामुळे बाजारात गर्दी असून याचा फायदा समाजकंटक घेऊ शकतात. त्यांच्यावर नजर ठेवण्यासाठी सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्याच्या उद्देशाने पोलीस दक्षता बाळगत असून कॅमेऱ्याच्या माध्यमातून नजर ठेवून असल्याचे प्रशिक्षक डिवायएसपी करिश्मा चौधरी यांनी सांगितले आहे.

सध्या विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू असून काही असामाजिक तत्व या बाधा निर्माण करू शकतात. या असामाजिक तत्वांच्या क्रियेला आळा घालता यावा या उद्देशाने जालना पोलिस प्रशासनाने सदर बाजार हद्दीत २० - २५ कॅमेरे बसवले आहेत. याच प्रमाणे शहरात वर्दळ असलेल्या जागांवर कॅमेरे बसविण्यात आले आहेत. कॅमेरे हे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद कुलकर्णी, सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या मार्गदर्शनाखाली लावण्यात आले आहे.




जाफराबाद पोलिसांचा गावठी हातभट्टी दारू अड्ड्यावर छापा

# ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

**जाफराबाद । प्रतिनिधी -** जाफराबाद पोलीस स्टेशन अंतर्गत जाफराबाद तालुक्यातील आढावा ग्रामीण भागातील शिवारात गुप्त माहिती मिळाल्यानुसार अवैध हातभट्टी गावठी दारूचा अड्डा चालवत असल्याची माहिती मिळाली. सध्या निवडणुकीची आचारसंहिता चालू आहे. उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जाफराबाद पोलीस स्टेशन अंतर्गत विविध पदके तयार केलेली असून त्यातलाच एक भाग म्हणून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने विविध फटके लक्ष ठेवून आहेत. त्यातच गुप्त माहितीनुसार आढावा शिवारामध्ये गावठी हातभारती दारूचे अड्डे असल्याचे माहिती मिळाली जाफराबाद पोलीस स्टेशनचे धडाकेबाज पी आय प्रताप इंगळे यांच्या नेतृत्वात पोलीस नाईक पठाडे, पोलीस कॉन्स्टेबल शेजुळ, पोलीस कॉन्स्टेबल जायभाये, पोलीस कॉन्स्टेबल डोईफोडे यांच्या पथकाने आढा शिवारामध्ये, छापा टाकून ९०००० चा मुद्देमाल जप्त केला. सविस्तर माहिती की अर्जुन शामराव मोरे याचा हा अड्डा असून तू अवैध दारू अड्डा चालवत असल्याची माहिती मिळाल्यानुसार आडाशिवारात पान २ वर



# उमेदवारांच्या लेखांची करणार तीन वेळा तपासणी

## खर्च निवडणूक निरीक्षक देवप्रकाश बमनावत

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघातील खर्च तपासणीसाठी खर्च निवडणूक निरीक्षक म्हणून देवप्रकाश बमनावत (आयआरएस) यांची नियुक्ती भारत निवडणूक आयोगाने केलेली आहे. उमेदवारांच्या खर्चाची पहिली तपासणी दि. ८ नोव्हेंबर, दुसरी दि. १३ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी दि. १७ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात येणार आहे. तरी उमेदवारांनी दिलेल्या तारखेत व वेळेत लेख्यांची तपासणी करुन घ्यावी, असे आवाहन मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा नोडल अधिकारी (खर्च) राजू सोळुंके यांनी केले आहे.

उमेदवाराच्या प्रचाराच्या कालावधीत किमान तीन वेळा ते प्रत्येक उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदवहीची तपासणी करतील. उमेदवार यांना व्यक्तीशः किंवा आपल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत नोंदवही सादर करणे आवश्यक आहे. ही तपासणी ही निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय तथा तहसील कार्यालय जालना येथे प्रथम सत्रात सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०३- भोकरदन विधानसभा मतदारसंघातील आणि द्वितीय सत्रात दुपारी २.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत १०२-बदनापूर व १०१-जालना विधानसभा मतदार संघातील उमेदवारांच्या खर्चाची तपासणी करण्यात येईल. विधानसभा निवडणुक प्रक्रियेमधील प्रत्येक तपासणीनंतर उमेदवाराच्या दैनंदिन निवडणूक खर्चाची नोंदवही तपासणीच्या तारखेपर्यंत स्कॅन करण्यात येऊन निवडणुक आयोगाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ पान २ वर

## संपादकीय पान

# क्रिकेटचा किंग, चेस मास्टर!

आज राज्यात विद्यार्थी दिन साजरा केला जातो. याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० साली विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक जिल्हा सातारा येथे शाळेत प्रवेश घेतला होता. त्यावेळी शाळेत भिवा म्हणून त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती. या शाळेतील जनरल रजिस्टरमध्ये १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या नावाची नोंदणी व त्यासमोरील स्वाक्षरी ही ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आजही शाळा प्रशासनाने जपून ठेवली आहे. या शाळेत ते १९०४ सालापर्यंत म्हणजे चौथी पर्यंत शिकले. ई स २००३ पासून पत्रकार अरुण जावळे हे हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करीत होते. २०१७ मध्ये बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून त्याच्या परिश्रमाची जाण व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावर्षी दिवाळीची सुट्टी असल्याने शाळा, महाविद्यालये बंद असली तरी या स्पर्धा ऑनलाइन आयोजित केल्या जाणार आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगाची चाहूल म्हटली पाहिजे. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळे ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे आणि वंचितांचे उध्दारकर्तेही झाले. विशेष म्हणजे ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून देशभर गौरव होत असतो त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकारही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली गेली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासाला कूस बदलायला लावणारी घटना आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते त्यांनी आपला विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. आजचा विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे.



जर देशात आदर्श विद्यार्थी निर्माण झाले तर आपल्या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या ऐतिहासिक दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! तसेच सर्व विद्यार्थी मित्रांना विद्यार्थी दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

---

सतीश घाटगेंच्या प्रचार दौऱ्यास सुरुवात; नृसिंह महाराजांच्या चरणी नतमस्तक होत फोडले प्रचाराचे नारळ

# विश्वास ठेवा घनसावंगीचा कायापालट करून दाखवेल अन्यथा पुढच्या वेळी तुमच्याकडे येणार नाही - सतीश घाटगे





**घनसावंगी । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीचे मैदान ४ तारखेपासून तापायला सुरुवात झाली आहे. घनसावंगी विधानसभेची निवडणूक तिरंगी होणार असल्याची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. दरम्यान जनतेच्या आग्रहाखातर निवडणुकीच्या मैदानात उतरलेले समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी मंगळवारी घनसावंगी शहराचे आराध्य दैवत श्री नृसिंह महाराज मंदिरात सपत्नीक दर्शन घेऊन प्रचाराचे नारळ फोडले. प्रसंगी मतदार संघातील विविध गावातील समस्यांची मला जाण असल्याचे उमेदवार सतीश घाटगे यांनी येथे म्हटले आहे. तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा मी जिंकल्यानंतर येथील बेरोजगारीचा प्रश्न, पाण्याचा प्रश्न, रस्ते आदींचे सर्वच मुलभूत प्रश्न सोडवून घनसावंगी मतदार संघाचा कायापालट करून दाखवेल अन्यथा पुढच्या वेळी तुमच्याकडे येणार नसल्याचेही श्री घाटगे यांनी छातीठोकपणे सांगितले. या प्रसंगी हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत त्यांनी परिवर्तनाचा एल्गार केला. मंगळवारी दिवसभरात त्यांनी केलेल्या प्रचार दौऱ्यास जनतेचं मोठा प्रतिसाद मिळाला. मतदार संघातील विविध गावात त्यांनी कॉर्नर बैठका, रॅली काढली. ठिकठिकाणी त्यांचे स्वागत होत आहे. घनसावंगी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना रंगेल अशी सर्वसामान्यांना वाटत होते. परंतु, महायुतीत सतीश घाटगे आणि हिकमत उढान दोघेही इच्छुक असल्याने पेच वाढला होता. समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांना पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्याने घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील त्यांना मानणाऱ्या जनतेने आणि त्यांच्या समर्थकांनी त्यांना अपक्ष उभा राहण्याचा आग्रह केला. जनता आणि कार्यकर्त्यांच्या भावनेचा आदर करून सतीश घाटगे यांनी विधानसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. शेवटच्या क्षणापर्यंत महायुतीकडून आणि मोठ्या नेत्यांकडून सतीश घाटगे यांना माघार घेण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. परंतु महायुतीच्या एकाही नेत्याला त्यांना थांबवण्यात यश आले नाही. शेवटी सतीश घाटगे यांनी जनतेला दिलेल्या शब्दांनुसार निवडणुकीतून माघार घेतली नाही. ४ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचे चिन्ह मिळाल्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी सतीश घाटगे यांनी आपल्या हजारो समर्थकांसह घनसावंगी शहरातील नृसिंह महाराज मंदिरात प्रचाराचे नारळ फोडत प्रस्तापिताविरोधात एल्गार केला. प्रचाराचा शुभारंभ केल्यानंतर घनसावंगी तालुक्यातील भेंडाळा, घाणेगाव, साकळगाव, दर्गा शरीफ, कोठाळा अनेक गावात त्यांनी भेट देऊन जनतेशी संवाद साधला. या प्रचार दौऱ्यास जनतेचा मोठा प्रतिसाद मिळाला.

**सर्वधर्मियाच्या दर्गा शरीफवर टेकला माथा** सतीश घाटगे यांनी रवना-पराडा येथील सर्वधर्मियाच्या दर्गाहवर माथा टेकून दर्शन घेतले. या लढाईत जनतेच्या स्वाभिमानाचा विजय होऊ दे...परिवर्तनाची पहाट उजाडू दे असे साकडे त्यांनी घातले. जगप्रसिद्ध सर्वधर्मियाचे हे श्रद्धास्थान विकासापासून वंचित असल्याचे खेदाने इथल्या धर्मगुरूंनी त्यांना सांगितले. या पवित्र ठिकाणी नतमस्तक होत, येणाऱ्या पाच वर्षात हे श्रद्धास्थान सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण करेल असा शब्द श्री घाटगे यांनी दिला.

---

कॅनडातील हिंदू मंदिरावरील हल्लेखोरांवर कठोर कारवाई करा

# अन्यथा कॅनडाच्या भारतातील दूतावासासमोर निदर्शने करू !

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** कालच कॅनडाच्या ब्रेम्प्टन भागातील हिंदू मंदिरावर 'सीख फॉर जस्टीस' या संघटनेने आणि खलिस्तानवादी कार्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक हल्ला केला; मात्र या हिंसक हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याऐवजी त्यांनाच पाठिशी घालण्याचा प्रकार कॅनडा सरकारने केला आहे. याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करतो. यापूर्वीही कॅनडामध्ये मंदिरांवर हल्ले झाले आहेत. कॅनडा सरकारने हे सर्व हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना करून सर्व हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी, अशी आमची मागणी आहे. अन्यथा कॅनड सरकारला जागे करण्यासाठी भारतातील त्यांच्या दूतावासासमोर हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात येईल, अशी चेतावणी हिंदु जनजागृती समितीने दिली आहे.

भारतीय उच्चायुक्त हे कॅनडातील मंदिराच्या भेटीसाठी जाणार हे माहिती असतांनाही त्यांच्या आणि मंदिर यांच्या सुरक्षेसाठी वा सदर हल्ला होऊच नये म्हणून कॅनडा सरकार काहीही ठोस कृती केलेली नाही. त्यामुळे या हल्ल्याला कॅनडा सरकारची मुकसंमती होती का ? असा प्रश्न निर्माण होत आहे. खलिस्तानी अतिरेकी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येनंतर कॅनडामध्ये हिंदूंवरील, तसेच मंदिरांवरील हल्ले रोखण्यात कॅनडा



सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. त्यामुळे भारत सरकारने हे सूत्र आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडून कॅनडा सरकारवर कारवाई करण्यासाठी दबाव निर्माण केला पाहिजे, अशी आमची भारत सरकारकडे मागणी आहे. हल्लेखोर संघटनेचे भारतात जे कोणी पाठिराखे असतील, त्यांच्यावर भारत सरकारने कठोर कारवाई करावी, अशी आमची मागणी आहे.

---

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. ६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजेपासून ते दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

---

## पान १ वरुन

### ९० हजारांचा ...

त्याच्या झोपडीवर छापा टाकण्यात आला. या कारवाईमध्ये जाफराबाद पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर नंबर ३१२ /२०२४ नुसार ६५ सी एफ कलमानुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास गिराम हे करीत आहे. सध्या आचारसंहिता असल्यामुळे कायदा संस्था बिघडू नये यासाठी ही पदके तैनात असून पोलिसांचे या गोष्टीकडे अधिक लक्ष असल्याचे दिसत असून. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याचे साठी पोलिसांची पथके तैनात आहे.

### उमेदवारांच्या लेख्यांची ...

साठी ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२-बदनापूर व १०३- भोकरदन मतदार संघात निवडणूकीसाठी उमेदवार निश्चित झाले आहेत. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम ७७ (१) हे लोकसभेच्या किंवा राज्य विधानसभेच्या प्रत्येक उमेदवारास ज्या तारखेस तो नामनिर्देशित झाला होता ती तारीख व निवडणुकीच्या निकाल घोषित झाल्याची तारीख या दोन्ही तारखांसह या दरम्यान त्याने केलेल्या किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या खर्चाचा स्वतंत्र व अचूक लेखा (हिशेब) ठेवणे अनिवार्य आहे. उक्त मर्यादेपेक्षा जास्त रक्कम खर्च करणे किंवा प्राधिकृत करणे हे लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १२३ (६) च्या संदर्भात भ्रष्ट आचारण आहे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

---

# २५ हजारांची लाच घेताना तलाठी जेरबंद

**जालना । प्रतिनिधी -** शेतजमिनीतील प्लॉटचा फेर घेण्यासाठी २५ हजारांची रुपयांची लाच घेताना तलाठी दुर्गेश गणेश गिरी याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने बुधवारी पकडण्यात आले. तलाठी दुर्गेश गिरी याच्याविरुद्ध कदीम जालना पोलीसठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जालना शहरातील शेती जमीन सर्वे नंबर २८४ मधील प्लॉट नंबर ४० हा फिर्यादीने खरेदी केला असून, सदर प्लॉटचा फेर घेण्यासाठी तलाठी दुर्गेश गणेश गिरी याने मंगळवारी २५ हजार रुपयांची मागणी केली. फिर्यादीची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार दाखल केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागच्या पथकाने तक्रारीची पडताळणी केली. त्यात सत्यता आढळून आल्याने पथकाने बुधवारी तहसील कार्यालय परिसरातील तलाठी सज्जा येथे सापळा रचला. तलाठी दुर्गेश गणेश गिरी याला फिर्यादीकडून २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. याप्रकरणी गिरी याच्याविरुद्ध कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

# राज ठाकरे; आत्मकेंद्रित भरकटलेला दीपस्तंभ

कोणतीही राजकीय पार्श्वभूमि नसलेला,अण्णा हजारेंच्या उदात्त विचाराने भारावलेला असा अरविंद केजरीवाल सारखा सनदी अधिकारी आला त्याने पाहिले आणि बघता बघता त्याने आपल्या अतुलनीय कार्यसिद्धीने,देश हिताच्या विचाराने,लोकांची मने जिंकत काँग्रेस भाजप सारख्या राष्ट्रीय पक्षाला चारी मुंड्या चितपट करत दिल्लीवर आम आदमी पार्टीचा झेंडा डौलाने फडकावला. अल्पावधीत जर केजरीवाल करू शकतात तर ज्यांनी बाळासाहेबांच्या बरोबर शिवसेनेचा घोडा महाराष्ट्रभर उधळत ठेवला ते राज ठाकरे वैचारिक मतभेदामुळे स्वतःचा मनसे नावाचा पक्ष काढून दशक उलटून गेले तरी स्वतःची ब्लु प्रिंट,व्हिजन राबवू शकले नाही.सभेला प्रचंड गर्दी जमते पण त्याचे रूपांतर मतदान पेटीत दिसून येत नाही ह्याचा कधी सखोल विचार केला असेल तरी त्यात प्रगती का होत नाही.ह्याचा विचार केला तर सुपारीबाज,टोल चा झोल,नकलाकार अशी शेलकी विशेषणे लागली तरी त्यावर कधी ठामपणे खुलासा केला नाही.मातोश्रीवर जशी संधीसाधू राजकीय नेत्यांची मांदियाळी लागायची तोच प्रकार राजगडावर पाहायला मिळाला त्याचा राजकीय फायदा राज ठाकरे यांनी किती उचलला हे गुपित असले तरी ज्या मनसैनिकांवर खोट्या केसेस, तडीपार नोटीस,मानसिक दबाव अश्या अनेक घटनाचे किती प्रश्न सोडवले हे अजूनही गुलदस्त्यात आहे.राज ठाकरे यांच्या विचाराने भारलेले कट्टर नेते संधिसाधून पक्ष खिळखिळा करून सोडून का गेले ह्याचे परीक्षण केले असले तरी त्यावर तोडगा का निघत नाही.राज ठाकरे मोदी शहांची खिल्ली उडवायचे आता पाठराखण का करतात.लोकसभा निवडणुकीत मोदींनी न मागता बिनशर्त पाठिंबा देऊन स्वतःच्या पक्षातील दिग्गज नेत्यांची राजकीय ससे होलपट केली.मोदींचा देशाला मित्रांना मदत करत ये बेच,वो बेचो करत पार रसातळाला नेणारे निर्णय राज ठाकरे याना गुलाबजाम वाटले काय ? भर जाहीर सभेत मला एक संधी द्या,मी महाराष्ट्राचा कायापालट करतो. अशी ग्वाही देऊन सत्ता स्थापनेसाठी विनवणी करायची.उमेदवार कमी उभे केले हे विसरून गेले काय ? येत्या निवडणुकीत भाजपचाच मुख्यमंत्री होणार हे




सांगून सत्तेत आम्हालाही वाटा मिळावा म्हणून मखलाशी केली काय ? राज ठाकरे गुजरात मॉडेल बघून आले.तोंड भरून मोदींची जाहीर प्रशंसा केली.ते दिल्लीत अमित शहाना भेटले.केजरीवाल यांनी दिल्लीचा कायापालट कसा केला ते पाहायाला परदेशी पाहुणे,नेते येतात पण राज ठाकरे सदिच्छा भेट द्यायला सुद्धा गेले नाहीत.ह्याला राजकीय अपरिपक्वता म्हणायची कि राजकीय अहंकार ? राज ठाकरे यांचा विस्कटलेला भक्कम मराठी मनगटाचा पक्ष महाराष्ट्राच्या सत्तेच्या खुर्च्या उबवणार कि, लांगुन चालन करणाऱ्या पक्षांना मोठे करत फक्त पाठिंबा देत राहणार ह्याचा विचार करत नसावेत.पक्ष कितीही भक्कम वाटत असला तरी राज ठाकरे हे भरकटलेल्या दीपस्तंभासारखेच राहणार असेच दिसते.राज ठाकरे यांच्या दिसण्याचे,बोलण्याचे,वक्तृत्वाचे वलय सभेला,प्रसारमाध्यांना आकर्षित करते,कारण आव्हान देणारे प्रश्न विचारून आपल्या वाढीव टीआरपी ची तजवीज प्रसारमाध्यमे करत असतात.२०२४ ला महायुती सरकार आले तर त्यात सत्तेचे भागीदारी होण्याचा मानस असला तरी आपला शिंदे अजित पवार होणार नाही ह्याची दक्षता घेण्याची क्षमता आहे काय ? मोठ्ठा मासा छोट्या माश्याला कधीही गिळंकृत करू शकतो तर त्यावर मात करण्याची क्षमता आहे काय ? सध्या महाराष्ट्रात महायुती किव्वा महाआघाडीचेच सरकार येऊ शकते ह्याचा विचार करता २०२९ ला महाराष्ट्रावर मनसेचीच सत्ता येणार हि गर्जना केली त्यासाठी प्रशांत किशोर,अरविंद केजरीवाल ह्यांचा मोलाचा सल्ला घेऊन प्रयत्न करायला हरकत नाही.भविष्यात राज ठाकरे यांनी कर्तृत्व सिद्ध केले नाही तर ते राजकारणात चेष्टेचा विषय होतील. राज साहेब रात्र वैऱ्याची आहे, सावध व्हा.

**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर**

---

# मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिराप्रमाणे अन्य मंदिरांनी भाविकांच्या कपाळी टिळा लावण्याचा निर्णय घ्यावा; मंदिर महासंघाची मागणी

**मुंबई -** येथील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाला दर्शन



घेतल्यानंतर श्रीगणेशाचा आशीर्वाद म्हणून कपाळी टिळा लावण्याचा स्तुत्य निर्णय मंदिर प्रशासनाने नुकताच घेतला आहे. या निर्णयाचे महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने अभिनंदन करतो. अशाच प्रकारे राज्यातील अन्य मंदिरांनमध्येही कपाळावर टिळा लावण्याचा निर्णय संबंधित मंदिर विश्वस्त तथा मंदिर प्रशासनाने घ्यावा, असे आवाहन 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'ने केले आहे.

हिंदु धर्मात कपाळी टिळा लावण्याला विशेष आध्यात्मिक महत्त्व आहे. कपाळवर टिळा लावण्याने भक्ताला त्या देवतेची शक्ती आणि चैतन्य यांचा लाभ तर होतोच. त्याचबरोबर त्या त्या देवाप्रती भक्तीभाव वाढण्यास साहाय्य होते. त्यामुळे श्री सिद्धिविनायक मंदिराच्या कृतीने अन्य सर्व मंदिरे अनुकरण करतील, अशी आशा आहे, असे मंदिर महासंघाने म्हटले आहे.

# निवडणूक विषयक राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण बंधनकारक - जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पांचाळ

## मुद्रीत माध्यमाद्वारे मतदान आणि मतदानाच्या पूर्वीच्या दिवशी प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचे पूर्वप्रमाणीकरण करणे आवश्यक

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण करण्याचे निर्देश दिले आहे. जालना जिल्हा विधानसभा मतदारसंघासाठी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे. निवडणूक विषयक सर्व राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी तथा समिती अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी कळविले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात माध्यम कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून, माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती या कक्षात कार्यान्वीत करण्यात आली आहे. उमेदवार व राजकीय पक्षांनी आपल्या राजकीय जाहिरातीचे प्रमाणीकरण करून घेण्यासाठी आपले अर्ज दिलेल्या मुदतीत माध्यम कक्षातील माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडे सादर करावे. असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. पांचाळ यांनी केले.

राजकीय प्रचाराच्या जाहिरातींबाबत भारत निवडणूक आयोगाने नियमावली निश्चित केली आहे. या नियमावलीनुसार राजकीय पक्ष व उमेदवारांना दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हॉईस संदेश, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळावर दर्शविण्याच्या जाहिराती तसेच मतदानाच्या दिवशी आणि त्याच्या एक दिवस अगोदर वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती ह्या देखील माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीकडून (एम.सी.एम.सी.) पूर्व प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय पक्ष, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी जाहिरात प्रसारित होण्याच्या तीन दिवस अगोदर जाहिरात प्रमाणीकरणासाठी जाहिरात व अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तर अनोंदणीकृत राजकीय पक्ष किंवा इतर व्यक्तींनी किमान सात दिवसापूर्वी समितीकडे अर्ज करणे आवश्यक आहे. माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती अर्थात एम.सी.एम.सी. समिती ही अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो अर्ज ४८ तासात निकाली काढेल. जाहिरात नियमानुसार नसल्याचे समितीला आढळून आल्यास एम.सी.एम.सी. समितीला जाहिरात प्रमाणिकरण नाकारण्याचा अधिकार आहे. समितीच्या निर्णया विरुद्ध राज्य समितीकडे अपील करता येते. मात्र त्यानंतर केवळ सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येईल. समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या २४ तासात राजकीय पक्ष किंवा उमेदवाराने त्यानुसार दुरुस्त्या करून नवीन निर्मित केलेली जाहिरात प्रमाणीकरणासाठी सादर करणे आवश्यक आहे. जाहिरात प्रमाणीकरणासाठीचा अर्ज हा विहित नमुन्यात समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. अर्जामध्ये अर्जदाराचे नाव व पत्ता, उमेदवार किंवा पक्षाचे नाव किंवा सदर जाहिरात एखादी संस्था - ट्रस्ट- संघटना यांच्याकडून दिली जात असल्यास त्यांचे नाव, मतदारसंघाचे नाव, राजकीय पक्षाचे मुख्यालयाचा पत्ता, ज्या चॅनल / केबल नेटवर्कवर जाहिरात प्रसारित करायची आहे, त्याबाबत स्पष्ट माहिती कोणत्या उमेदवाराच्या हितासाठी सदर जाहिरात करण्यात आली आहे, त्याबाबत माहिती, जाहिरात सादर करण्यात येत असल्याची दिनांक, जाहिरातीसाठी वापरण्यात आलेली भाषा, त्याच्या संहिता लेखनाच्या (ट्रास्कींसप) साक्षांकित दोन प्रती, जाहिरातीचे शिर्षक, जाहिरात निर्मितीचा खर्च, जाहिरात जर चॅनेलद्वारे प्रसारित केली जात असेल तर किती वेळा ती प्रसारित केली जाणार आहे, त्याचे प्रस्तावित केलेले दर, त्यासाठी लागलेला एकूण खर्च आदी सविस्तर माहिती अर्जदाराने निवडणूक आयोगाने दिलेल्या विहित नमून्यात स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे. आदर्श आचारसंहितेनुसार दिलेल्या निर्देशाचे जाहिरातीमध्ये पालन होणे आवश्यक आहे. या प्रामुख्याने राष्ट्रीय एकात्मतेला हानी पोहोचविणाऱ्या बाबी, धार्मिक भावना दुखावणे, भारतीय घटनेचा अवमान करणे, गुन्हा दाखल करण्यास प्रवृत्त करणे, कायदा व सुव्यवस्थेस बाधा निर्माण करणे, गुन्हेगारीचे उदात्तीकरण, महिलांचे चुकीचे चित्रण, तंबाखूजन्य किंवा नशा आणणाऱ्या पदार्थाच्या जाहिराती, हुंडा, बालविवाह यांना उत्तेजन देणाऱ्या जाहिराती प्रसारित करण्यास प्रतिबंध आहे. इतर देशावर टिका नसावी. न्यायालयाचा अवमान जाहिरातीतून होता कामा नये. राष्ट्रपती व न्याय संस्था यांच्याबाबत साशंकता नसावी. राष्ट्रीय एकात्मतेला, सौहार्दतेला आणि एकतेला बाधा पोहचविणारा मजकूर त्यामध्ये नसावा. सुरक्षा दलातील कोणतेही सैनिक, व्यक्ती, अधिकारी यांची अथवा सैन्यदलाचे छायाचित्र जाहिरातीत नसावे. कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी / वैयक्तिक जीवनातील घटनांना धरुन त्यावर भाष्य नसावे. व्हिडीओ व्हॅनद्वारे प्रचारासाठी उपयोगात आणले जाणारे साहित्य याचे माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. या वाहनाची निवडणूक विभागाकडून रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीला उमेदवार किंवा राजकीय पक्ष यांच्या संमती शिवाय प्रचार करणाऱ्या जाहिराती देता येणार नाहीत. अनुमती शिवाय जाहिराती प्रकाशित झाल्यास प्रकाशकावर गुन्हा दाखल करण्यात येईल. मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या एक दिवस अगोदर मुद्रीत माध्यमाद्वारे प्रकाशित करावयाची जाहिरात प्रमाणीकरणसाठी समितीकडे दोन दिवस आधी जाहिरातीसह अर्ज सादर करणे आवश्यक असल्याचेही जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी तथा समिती अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी कळविले आहे.

# आसरखेडा रस्त्याचे काम संथ गतीने

## वाहन चालवितांना वाहनचालकांची कसरत, अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** तालुक्यातील आ सरखेडा ते बावणे पांगरी या दहा किलोमीटर रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहे. या खड्डेमय रस्त्यातून वाहनचालविताना वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. या रस्त्यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते आहे. रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असल्याने ग्राम स्थाकांकडून संताप व्यक्त होत आहे.



जाफराबाद तालुक्यातून हा मार्ग बदनापूर तालुक्यातील जालना-भोकरदन रस्त्याला जोडलेला आहे. त्या पाठोपाठ विदर्भातून देऊळगावराजा ह्या मार्ग मराठवाड्यात रस्त्याला जोडलेला आहे. त्यामुळे या रस्त्यावर वाहनाची नियमित वर्दळ असते. जाफराबाद तालुक्यातून अकोलादेव बावणे पांगरी या १७ किलोमीटर रस्त्यावर बर्दळ असते. पुलांचे रस्त्यांचे काम करण्याची गरज असल्याचे चर्चा होत आहे. ग्रामीण भागातील गावा गावामध्ये जाफराबाद व बदनापूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष का नाही, शासनाकडून रस्त्याला निधी मिळत नाही की काय असा प्रश्न नागरिक करत असल्याचे आरोप होत आहे. रस्त्यावर बदनापूर तालुक्यातील बावणे पांगरी, आसरखेडा, बावणे पांगरी, आसरखेडा, जाफराबाद तालुक्यातील अकोला देव, बुटखेडा, पोखरी, डोणगाव, सातेफळ, इस्लामवाडी, निवडुंग या रस्त्यांची या रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. या रस्त्यांची चाळणी झाल्याने या रस्त्यावरून वाहन चालविण्यासाठी वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. रस्त्यावरील खडी उघडी पडल्याने किरकोळ अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. या खराब रस्त्यांचा वाहनचालकांना त्रास होत आहे. गेल्या काही महिन्यांपासून या रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. परंतु संबंधित गुत्तेदार यांच्याकडून या रस्त्यांचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे. शिवाय निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे आरोप ग्रामस्थांकडून होत आहे.

**आसरखेडा-बावणे पांगरी**

रस्त्याचे काम कासव गतीने सुरू आहे. कधी बंद तर कधी सुरू राहत आहे. कामही निकृष्ट दर्जाचे होत आहे. गेल्या बऱ्याच दिवसांपासून आसरखेडा- बावणे पांगरी रस्त्याचे काम संथ गतीने सुरू आहे. वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. हे काम दर्जेदार करण्यात यावे अशी मागणी डोणगावचे ग्रामस्थ साजेद शेख यांनी केली आहे.

# तात्काळ निदान व उपचाराने कर्करोग बरा होऊ शकतो-डॉ. आदित्य मंत्री

## एसआरपीएफ कॅम्पमध्ये कर्करोग मार्गदर्शन शिबिर संपन्न

**जालना । प्रतिनिधी-** तात्काळ निदान झाल्यास उपचाराने कर्करोग ९० ते ९५ टक्के बरा होऊ शकतो. त्यामुळे काही शंका आल्यास अथवा लक्षणे दिसू लागताच तात्काळ तपासणी करून घ्यावी व संभाव्य धोका टाळावा, असे प्रतिपादन कर्करोग शस्त्रक्रिया तज्ञ डॉ. आदित्य दीपक मंत्री यांनी येथे बोलताना केले.

शहरातील एसआरपीएफ कॅम्पमध्ये पोलीस जवानांसाठी आयोजित कर्करोग मार्गदर्शन शिबिरात डॉ. आदित्य मंत्री बोलत होते. व्यासपीठावर एसआरपीएफच्या कमांडंट उज्वला वनकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीमती जे. के. वाडिया, श्री. होटकर, स्त्रीरोग तज्ञ डॉ. आरती मंत्री, ओंको पॅथॉलॉजीस्ट डॉ. श्वेता सिकची यांची उपस्थिती होती. छत्रपती संभाजीनगर येथील ओंकोरिलीफ कॅन्सर क्लिनिकमध्ये गेल्या चार वर्षांपासून कॅन्सर तज्ञ म्हणून सेवा देत असलेले डॉ. मंत्री यांनी आतापर्यंत स्तनाच्या, गळ्याच्या, छातीच्या आणि पोटाच्या कठीण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या केल्या आहेत. यावेळी पोलीस जवानांना मार्गदर्शन करताना त्यांनी कर्करोगाच्या पूर्वचाचण्या (स्क्रीनिंग टेस्ट), लक्षणे दिसल्यास त्वरित निदान व या आजारावर करण्यात येणाऱ्या विविध उपचार पद्धती, शस्त्रक्रिया, बिना टाक्याच्या शस्त्रक्रिया तसेच रोबोटिक सर्जरीबद्दल सखोल माहिती दिली. उपस्थितांनी



विचारलेले प्रश्न आणि शंकांना अत्यंत सोप्या भाषेत उत्तरे देऊन या शंकांचे निरसन केले. ते म्हणाले की, एकेकाळी जीवघेणा आजार म्हणून कर्करोगाकडे पाहिले जायचे. मात्र, आता आधुनिक उपचार पद्धतीमुळे तात्काळ निदान झाल्यानंतर उपचाराने हा आजार ९० ते ९५ टक्के बरा होतो आणि असे रुग्ण सामान्य जीवन जगू शकतात, याबाबतची त्यांनी अनेक उदाहरणे दिली. बऱ्याचदा कर्करोग उपचार आणि शस्त्रक्रियेनंतर आपण आता एकदम बरे झालो आहोत, पुन्हा डॉक्टरांना दाखवायची गरज नाही हा जो गैरसमज आहे, तो चुकीचा आहे. सातत्याने तीन ते चार महिन्याला तपासणी करून घेणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. डॉ. श्वेता सिकची यांनी कर्करोगाच्या विविध तपासण्याबद्दल सखोल माहिती दिली. याप्रसंगी एसआरपीएफ कॅम्पमधील २०० पोलीस जवान उपस्थित होते.

## परतुर तालुक्यावर शोककळा;

# विक्रम माने यांचे निधन

**वाटूर । प्रतिनिधी -** येथील विक्रम दगडुबा माने यांचे आजारणपणामुळे दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ रविवार रोजी निधन झाले.



त्यांचे शैक्षणिक कॉलेज जीवन जालना व औरगांबाद येथे पार पडले तदनंतर त्यांनी १९८३ ते १९९५ दरम्यान वाटुर गावाचे सरपंच राहिले तसेच ते वाटुर ग्रामपंचायतीचे सदस्य पदी साधारणता: २० वर्ष राहिले. त्यानंतरच्या कार्यकाळात ते परतुर कुषि उत्पन्न बाजार समिती चे संचालक १९९६ ते २००५ दरम्यान १० वर्ष राहिले. त्यानंतर च्या कार्यकाळात समाजकल्याण राज्य मागासवर्गिय वसतीगृहाचे राज्यसदस्य राहिले. वाटुर येथील तंटामुक्ती समिती चे अध्यक्ष ते २००९ पासुन आजन्म राहिले. महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचे परतुर तालुका चेअरमन राहिले होते व जनतेमध्ये प्रगत शेतकरी म्हणुन ते सुप्रसिद्ध होते तसेच विशेष कार्यकरी दंडाधिकारी विशेष कार्यकर्ता पदी ते होते.

त्याचे सर्वच राजकीय पक्षा सोबत संबंध चागले राहिले. वाटुर गावामध्ये पोलिस स्टेशन, सरकारी दवाखाना आणण्यासाठी मोलाचे योगदान दिले तथा रस्ते, नळ, नाल्या, पथदिवे व पाणंदमुक्ति इत्यादि विकासत त्यांची महत्वाची कामगिरी राहिली.

# सुटीत बाहेरगावी जाताना शेजाऱ्यांना कळवावे

## घरफोडी रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** सुटीत बाहेरगावी गेल्यानंतर घरात चोरी होऊ नये, म्हणून नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी असे आवाहन टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन कांबळे यांनी केले आहे. बाहेरगावी जाताना घर कुलूप बंद करून शेजारी आपला पहारेकरी या म्हणीप्रमाणे आपल्या शेजाऱ्यास घरावर लक्ष ठेवण्याबाबत कळवावे. घराच्या दरवाजा उच्च प्रतीचे कुलूप व कोंडा लावावा. बाहेरून दिसणारे घरातील लाईट चालू स्थिती ठेवावे. शक्य असल्यास घराच्या अवतीभवती चांगल्या प्रतीचे सीसीटीव्ही लावण्यात यावे. आपल्या गल्लीत काहीतरी विक्री करण्याच्या उद्देशाने अनोळखी व्यक्तीची सखोल चौकशी करावी. तसेच आपल्या मोबाइलमध्ये त्या व्यक्तीचा फोटो काढून घ्यावा. बाहेरगावी जाताना संबंधित पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना कळवावे. तसेच घरातील सोन्या-चांदीचे दागिने किंवा मौल्यवान वस्तू व रोख रक्कम घरातील कपाटात न ठेवता बँकेच्या लॉकरमध्ये ठेवावी: कारण चोरट्यांचे पहिले टार्गेट कपाट असते. तसेच आपल्या आजूबाजूच्या परिसरातील लाइट रात्रीच्या वेळी चालू स्थितीत राहतील, याबाबत प्रयत्न करावे, असे पोलिस निरीक्षक सचिन कांबळे यांनी सांगितले.



**ग्राम सुरक्षा दल स्थापन करून गस्त घालावी**

गावाच्या कडेला राहणाऱ्या ग्रामस्थांनी जास्त काळजी घ्यावी. आपल्या गल्लीत किंवा गावांमध्ये ग्राम सुरक्षा दल स्थापन करून आळीपाळीने गल्लीत किंवा गावात रात्रीची गस्त ठेवावी. शक्यतो आपल्या घरातील सर्व माणसे बाहेरगावी न जाता एखादी व्यक्ती घरी राहील याची दक्षता घ्यावी. तसेच कुणी संशयित व्यक्ती आढळून आल्यास पोलिस मदतीसाठी क्रमांक ११२ वर संपर्क साधावा असावा, असे आवाहन खामगळ यांनी केले आहे.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे खंबीर नेतृत्व डॉ.आर.बी.सिंह यांचे दुःखद निधन

**कल्याण । प्रतिनिधी -** अखिल भारतीय महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर संघाचे अध्यक्ष व धडाडीचे नेतृत्व तसेच शिक्षकेतर कर्मचा-यांचे आराध्य दैवत,भाग्यविधाते पितृतुल्य डॉ.आर.बी.सिंह यांचे आजारपणामुळे नुकतेच फोर्टीज हॉस्पिटल कल्याण येथे उपचारा दरम्यान दुःखद निधन झाले,या धक्कादायक बातमी मुळे शिक्षकेतर कर्मचारी परिवाराचा आधार स्तंभ हरपला या भावनेने सर्वत्र शोककळा पसरली होती.शिक्षकेतर कर्मचारी परिवार परिवारासाठी दुर्दैवी व दुःखद बातमी,काळा दिवस व मनाला चटका लावणारी बातमी होती.कै.डॉ.आर.बी.सिंह यांनी राज्यव्यापी व देशव्यापी महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी अनेक वर्षे त्यांच्या न्याय्य व रास्त मागण्यांसाठी शासन दरबारी प्रलंबित असलेल्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी संप,मोर्चे,साखळी उपोषणे,धरणे,आमरण उपोषणे रास्ता रोको आणि जेल भरो या सारखी आंदोलने राबवून व तसेच वेळोवेळी शासनाशी चर्चा घडवून शिक्षकेतर कर्मचा-यांना हक्काचा न्याय मिळवून दिलेला आहे. त्यांचे खंबीर व धडाडीच्या नेतृत्वा पासून



शिक्षकेतर कर्मचारी वर्ग पोरका झाला असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.डॉ.आर.बी. सिंह यांच्या निधनामुळे कधीही न भरुन येणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या धडाडीच्या व खंबीर नेतृत्वास त्रिवार सलाम!डॉ. आर.बी.सिंह यांच्या पवित्र पार्थिवावर कल्याण पश्चिम येथील प्रेम आटो जवळ असलेल्या स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.याप्रसंगी शिक्षकेतर कर्मचारी परिवार,मित्र परिवार,आप्तेष्ट,नातेवाईक मंडळी व अन्य स्नेह इत्यादी उपस्थितांनी दुःखद नयनांनी भावपूर्ण व आदरपुर्वक श्रध्दांजली अर्पण करून त्यांच्या आत्म्यास शांती व सदगती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन अखेरचा निरोप दिला.

# जाफ्राबाद पोलीसांनी जपली सामाजिक बांधिलकी; गरजुंना फराळ वाटप

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** भारतात साजरा होणारा सर्वात मोठा आणि उज्वल सण म्हणजे दिवाळी होय. दिवाळी म्हणजे दिव्यांचा उत्सव. हा सण अंधारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतिक आहे. हा सण खूप उत्साहात साजरा केला जातो. घराघरात आनंदाने आणि आपापल्या परिस्थितीनुसार नवीन कपडे, दागिने, फराळ या गोष्टींबरोबर हा सण साजरा करतात. पण समाजात काही कुटुंब अशी आहेत कि ते केवळ आर्थिक दुर्बलतेमुळे सण साजरा करू शकत नाहीत. त्यांच्या घरात सणादिवशी चूल देखील पेटत नाही. आर्थिक विवंचना असते.याच गोष्टीची जाणीव ठेऊन जाफराबाद पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक प्रतापराव इंगळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तालुक्यातील कुंभारी फाटा येथे राहणाऱ्या पारधी समाजाच्या गौर गरीब गरजू व्यक्तींना दिवाळीत मोफत फराळ वाटप करून खाकितील देव माणूस दाखवून दिला व त्यांची दिवाळी ही गोड केली. यावेळी पोलिस निरीक्षक प्रतापराव इंगळे, महेश वैद्य, पोलिस मोरे, नाईक पठाडे, भापकर, पोलीस कॉन्स्टेबल गिराम,दिनकर चंदनशिवे, लक्कस, शेजुळ, मस्के उपस्थित होते.

### महायुतीची प्रचारात आघाडी; ठिकठिकाणी अर्जुन खोतकरांचे स्वागत

# मुख्यमंत्र्यांच्या विकासकामांमुळे विरोधक बिथरले - खोतकर







**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदार संघातील महायुतीचे (शिवसेना) अधिकृत उमेदवार म्हणून शिवसेना (शिंदे गट) नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतली त्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकू लागली असून मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी आपल्या मतदार संघात विविध विकास कामे केली आहेत. भविष्यातही तेच मुख्यमंत्री व्हावेत म्हणून मला प्रचंड मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन अर्जुनराव खोतकर यांनी यावेळी केले.

श्री. खोतकर यांनी काल मंगळवारी अंतरवाला, इंदेवाडी, सिरसवाडी आणि दरेगांवचा दौरा केला. यावेळी ढोल-ताशा, फटाके आणि बॅण्ड पथकाने गावा-गावात त्यांचे स्वागत करण्यात आले. या दौर्यात त्यांनी विरोधकांवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, आपण आणलेल्या कामाचे श्रेय लाटण्याचा केविलवाणा प्रयत्न येथील आमदार करत आहे. मी देवदेतांचा आणि ज्येष्ठांचा आशिर्वाद घेऊन प्रचारात उतरलो आहे. तर विरोधी पक्ष आणि त्यांचे नेते म्हणवणारे झोपेतून कधी उठतात, हे त्यांचे त्यांनाच माहित नसते, असे सांगून श्री. खोतकर म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे २४ तासातून २२ तास काम करणारे एकमेव मुख्यमंत्री ठरले आहेत. त्यांना महिलांसाठी लाडकी बहिण योजना आणली, मुलींचे शिक्षण पदवीपर्यंत मोफत केले, वीज बिल माफ केले. अशी कोणतीही योजना नाही जी मुख्यमंत्र्यांनी लागू केली नाही. विरोधी पक्ष काय करणार आहे? उलट त्यांचे सरकार आले तर ते या योजना बंद पाडतील. आपण पदावर असो वा नसो, तरीही ग्रामीण भागाचा विकास खुंटू दिला नाही. त्याची धार सातत्याने तेवत ठेवली. म्हणूनच विरोधक बिथरले आहेत. आयत्या बिळात नागोबा असतो ना तशी त्यांची गत झाली आहे. आपण कार्यान्वीत केलेल्या योजनांचे श्रेय घेण्यासाठी ते हापापले आहेत. पाणी, वीज आणि रस्त्यांबरोबरच अनेक योजना ह्या ग्रामीण भागात आपण राबवल्या आहेत. सत्ता असो वा नसो तरीही ग्रामीण भागाच्या विकासासाठी सातततत्याने प्रयत्न करणे ही आपण आपली जबाबदारी समजतो. परंतू त्यांनी तर सत्तेत असूनही नळ योजना बंद केली होती, याची आठवण करुन देऊन ते म्हणाले की, गवळी आणि वंजारी समाजासाठी महामंडळ स्थापन करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असून मुख्यमंत्र्यांनी मराठा समाजाचा आरक्षणाचा मुद्दा हाती घेतला आहे, केवळ एक रुपयात पिकविमा देणारा पहिला मुख्यमंत्री म्हणून एकनाथराव शिंदे यांची नोंद आहे, एकनाथराव शिंदे पुन्हा मुख्यमंत्री झाले तर लाडक्या बहिणींना १५०० वरुन ३००० रुपये देऊ आणि अनेक योजना आपल्या सरकारने राबवल्या आहेत. महिलांना एस. टी. भाड्यात अर्धे तिकीट केले तर ज्येष्ठ नागरीकांना मोफत एस. टी. प्रवास केला. मुलींसाठी पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत केले. २४ तासातील २२ तास काम करणारे मुख्यमंत्री म्हणून एकनाथराव शिंदे यांचा गर्वाने उल्लेख करावा लागेल. जालना शहर आणि ग्रामीण भागातील विकास आपण करीत आलो आहोत व करीत राहणार, अशी ग्वाही श्री. अर्जुनराव खोतकर यांनी यावेळी दिली.

यावेळी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गांवकरी तसेच युवा सेना, शिवसेना महिला आघाडी, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच गणेश सुपारकर, सरपंच रवि ढगे, सुदर्शन ढगे, अंमा चौधरी, निलेश वाघुळे, अर्जुन वडसकर, आदींची उपस्थिती होती. तर यावेळी भाजप, कॉंग्रेसच्या पदाधिकार्यांसह कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्या सर्वांचे यावेळी स्वागत करण्यात आले. त्यात भाजपाचे विलास खरात, जनार्दन ढगे, शिवाजी ठोंबरे, शिवाजी कौचर तर कॉंग्रेसचे वैजिनाथ खेडकर, रामेश्वर ठोंबरे यांचा समावेश आहे.

# महाविकास आघाडीसाठी राज्यात पोषक वातावरण, दोनशे पार जागा मिळणार

### कॉंग्रेसचे मराठवाडा निरीक्षक रेड्डी यांचा दावा; महाविकास आघाडीच्या संपर्क कार्यालयाचे उदघाटन





**जालना । प्रतिनिधी -** राज्यात महाविकास आघाडीसाठी अत्यंत पोषक वातावरण निर्माण झाले आहे. मतदारांची देखील राज्यात परिवर्तन करण्याची मानसिकता असल्यामुळे महाविकास आघाडीला राज्यात किमान दोनशे जागा मिळतील असा विश्वास व्यक्त करून जालना विधानसभा मतदार संघातून महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांना आघाडीच्या सरकारमध्ये मंत्री पदाची संधी मिळेल अशी ग्वाही तेलंगणा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा कॉंग्रेस पक्षाचे मराठवाडा निरीक्षक उत्तमकुमार रेड्डी यांनी यावेळी बोलतांना दिली.

जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.कैलास गोरंट्याल यांच्या शहरातील मामा चौकातील मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उदघाटन रेड्डी यांच्या हस्ते आज बुधवारी सायंकाळी करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा.डॉ.कल्याण काळे हे होते तर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर,जगदिश्वर राव, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, रा.कॉ.चे जिल्हाध्यक्ष डॉ.निसार देशमुख, जेष्ठ नेते एकबाल पाशा, राजेंद्र राख, शेख युसुफ, अखबर खान, रिपाईचे किशोर मघाडे, आपचे संजोग हिवाळे, बदर चाऊस, विनय कोठारी, नंदाताई पवार, अब्दुल रऊफ परसुवाले, प्रभाकर पवार, गणेश राऊत, नंदकिशोर जांगडे, विजय चौधरी, दिनकर घेवंदे, अब्दुल रफिक आदिंची यावेळी उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना रेड्डी म्हणाले की, कॉंग्रेस पक्षाने आपल्यावर मराठवाडा विभागाची जबाबदारी सोपवली आहे. मागील काही दिवसात निवडणुकीच्या निमित्ताने विविध ठिकाणी जाण्याचा योग आला असून सामान्य जनता ही महाविकास आघाडीच्या बाजुने असल्याचे दिसून आले. राज्यात महाविकास आघाडीची सत्ता निश्चितपणे येणार असून सत्ता आल्यास मविआचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांच्यावर मोठी जबाबदारी सोपविण्यात येईल अशी ग्वाही देत राज्यात उध्दव ठाकरे, शरद पवार आणि कॉंग्रेस समन्वयाने काम करत असल्यामुळे मतदारांपर्यंत आघाडीच्या संदर्भात चांगला संदेश पोहचला आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मविआने जोरदार मुसंडी मारत जे यश मिळवले आहे तीच परिस्थीती विधानसभा निवडणुकीत राहील असे सांगुन किमान दोनशे जागांवर महाविकास आघाडीला यश मिळेल असे ते महणाले. तेलंगणा राज्यात कॉंग्रेस पक्षाचे सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांना सुमारे १८ हजार कोटी रूपयांची कर्ज माफी देण्यात आली असून आणखी १० हजार कोटी रूपयांची तरतुद करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगीतले. घरगुती गॅस सिंलेडर केवळ ५०० रूपयांत देण्याचा वायदा देखील पुर्ण केला असून तरूणांच्या हाताला काम देण्यासाठी देखील सरकारने पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्र राज्यात शेतकरी, बेरोजगार, दिन-दलीत, कष्टकरी, कामगारांना न्याय देण्यासाठी महाविकास आघाडी सरकार सत्तेवर येणे गरजेचे आहे. सर्व घटकांनी येणाऱ्या निवडणुकीत जागरूकपणे मतदान करून कैलास गोरंट्याल यांना विजयी करण्याचे आवाहन रेड्डी यांनी यावेळी केले.

**गोरंट्याल यांच्यारुपाने जालन्याला मंत्रिपद मिळणार - देशमुख**

जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंट्याल हे या निवडणुकीत मराठवाडा विभागातुन ऐतिहासिक मताधिक्यांनी विजयी होतील असा ठाम विश्वास कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी व्यक्त केला. राज्यात मविआची सत्ता येणार असून यावेळी जालन्यातील मंत्री पदाची भुक गोरंट्याल यांच्या रूपाने निश्चितपणे दुर होईल असे सांगुन लोकसभेप्रमाणेच मविआच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना परिश्रम घ्यावेत. भविष्यात सत्ता आली तर सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना निश्चीतपणे न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल अशी ग्वाही देशमुख यांनी यावेळी दिली.

### शिवसेनेमुळे ग्रामीण भागात प्रतिसाद - आ.गोरंट्याल

जालना शहर हे धर्मनिरपेक्ष विचाराचे शहर असल्यामुळे प्रत्येक निवडणुकीत आपल्याला शहरात मोठे मताधिक्य मिळाले असले तरी ग्रामिण भागात आपण नेहमीच पिछाडीवर राहिलेलो आहे. मात्र यावेळी उध्दव ठाकरे यांची शिवसेना सोबत असल्यामुळे ग्रामीण भागात देखील आपल्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचा दावा मविआचे जालना विधासभा मतदार संघातील उमेदवार कैलास गोरंट्याल यांनी केला आहे. शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सोबत असल्यामुळे शहरी भागाप्रमाणेच ग्रामिण भागातुन देखील आपल्याला मोठे मताधिक्य मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करून लोकसभा निवडणुकीत जसे यश मविआला मिळाले तशीच परिस्थिती विधानसभा निवडणुकीत देखील दिसून येत आहे. उध्दव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी कॉंग्रेस फोडण्याचा पाप करणाऱ्यांना लोकसभेत मतदारांनी धडा शिकवला आहे. महाराष्ट्र राज्य हे वारकरी संप्रदायाच्या विचाराने चालणारे राज्य असून मतपेटीतुन मतदार राजा हा आपला राग व्यक्त करतात असेही शेवटी गोरंट्याल म्हणाले.

**महायुतीच्या काळात महागाई, बेरोजगारीसह शेतकरी त्रस्त - अंबेकर**

महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांच्या विजयासाठी सर्व शिव सैनिक सज्ज झाले असल्यामुळे त्यांचा विजय कुणीही रोखु शकत नाही असा विश्वास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला. महायुतीच्या अडीच वर्षाच्या कार्यकाळात सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे. वाढती महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या मालाला मिळत असलेला तुटपुंजा भाव यामुळे सर्व घटक त्रस्त असून राज्यात परिवर्तन करण्याच्या मानसिकतेत आहे. एकीकडे लाडकी बहिण योजना राबवली जात असतांना दुसरीकडे तेलाचे तसेच जीवनावश्यक वस्तुंचे भाव वाढवुन सामान्य जनतेला मेटाकुटीस आणले आहे. त्यामुळे सामान्य मतदार केवळ २० तारखेच्या प्रतिक्षेत असून शिवसेनेची पुर्ण ताकद मविआचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांच्या पाठीशी असल्याने त्यांचा विजय जवळपास निश्चीत असून फक्त मताधिक्य किती मिळणार याकडे लक्ष असल्याचे अंबेकर म्हणाले.

**लोकसभेची पुनरावृत्ती करण्यासाठी कामाला लागा - खा. डॉ. काळे**

राज्यात सत्तेत असलेल्या महायुती सरकारने आपल्या सत्ता काळात केवळ जाती धर्मामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम केले असल्याची टिका खा.डॉ.कल्याण काळे यावेळी बोलतांना केले. जाती-धर्मात तेढ निर्माण करण्याचे काम करणाऱ्या या सरकारला सत्तेतुन खाली खेचण्यासाठी लोकसभेप्रमाणचे काम करण्याची आवश्यकता आहे. लोकसभेत झालेल्या विजयामुळे जालना विधानसभेतुन मविआचे उमेदवार आ.कैलास गोरंट्याल यांना विजयी करण्याची आपली जबाबदारी वाढली आहे. लोकसभेची पुनरावृत्ती करण्यासाठी कामाला लागा, रात्र वैऱ्याची असल्याने सर्वांनी सतर्क राहुन प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचुन गोरंट्याल यांच्या विजयासाठी परिश्रम घेण्याचे आवाहन खा. डॉ.कल्याण काळे यांनी केले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राम सावंत यांनी तर शेवटी आभार बाला परदेशी यांनी मानले.

## सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंची राज्यस्तरावर भरारी



**जाफराबाद -** येथील सिद्धार्थ महाविद्यालय चे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व विभागीय क्रीडा संकुल गारखेडा, परिसर छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यामानाने क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालयाचे खेळाडूंनी विविध खेळामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४ मध्ये १८ खेळाडूंची राज्यस्तरावर निवड झालेली आहेत.

कबड्डी मध्ये ओमराज उखर्डे, करण साळवे यांची निवड झाली आहे. तसेच श्रावण हाडे, हरिभाऊ सोरमारे लक्ष्मण काकफळे यांची खोखो निवड चाचणीसाठी निवड झाली आहे. सायकलिंग व कॅरम या खेळासाठी प्रणव विटोरे, आदिती खरात तसेच मैदानी स्पर्धेसाठी ८०० मीटर धावणे कु. तृप्ती जाधव व चार बाय ४०० मीटर रिले मध्ये प्रतीक्षा गाडेकर, वैशाली सरोदे, कशिश चरावंडे, कशिष भारद्वाज, तृप्ती जाधव व मुलांमध्ये थाळीफेक या खेळामध्ये ओमराज ओखर्डे तसेच चार बाय ४०० मीटर रिले मध्ये समीर शेख, परमेश्वर काळे, धीरज शेजुळ, उज्वल जाधव, ओमराज ओखर्डे यांची निवड झालेली आहे व क्रॉस कंट्री मध्ये कु. राजणी परदेशी यांची निवड झाली आहे मुलिंच्या स्पर्धा रत्नागिरी व मुलांच्या स्पर्धा पुणे येथे संपन्न होणार आहे. हे सर्व खेळाडू मराठवाडा विभागाचे नेतृत्व करणार आहेत.

या स्पर्धेमध्ये यश संपादन केल्यामुळे सिल्लोड शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आयुष्मान श्री. दादासाहेब म्हस्के, सचिव प्रा. राहुल म्हस्के,प्राचार्य डॉ.रमेश देशमुख, उपप्राचार्य डॉ. सुनील मेढे, उपप्राचार्य विनोद हिवराळे, मुख्याध्यापक श्री. रमेश मुरकुटे, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. संजय गाढवे, डॉ रेखा परदेशी, श्री.संतोष वाबळे, श्री.अरविंद विद्यासागर, श्रीमती. आरती चिल्लर व सिद्धार्थ कनिष्ठ वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व विद्यार्थिनी या सर्व खेळाडूंचे स्वागत व सत्कार करून पुढच्या क्रीडा स्पर्धेसाठी शुभकामना दिल्या. या सर्व खेळाडूंचे तालुक्यातून व जिल्ह्यातून कौतुक व अभिनंदन होत आहे. या सर्व खेळाडूंची मोलाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन तालुका संयोजक प्राध्यापक वाहेद पटेल,प्रा. शिवाजी वैद्य, प्रा. उदय वझरकर यांनी केले.

## देळेगव्हाण येथे गट शेती मेळावा उत्साहात

**जाफराबाद -** तालुक्यातील देळेगव्हाण येथे ॲग्रो इंडिया गट शेती संघाचा मेळावा पार पडला. यावेळी शेतकरी प्रकाश कापसे, विलास पंडित, गोविंदराव पंडित यांच्या शेतातील आंबा फळबागेत सर्वप्रथम शिवार फेरी करण्यात आली. याप्रसंगी केशर आंबा अतिघन लागवड पद्धतीबद्दल गट शेतीचे प्रणेते डॉ. भगवानराव कापसे यांनी मार्गदर्शन केले.

कापूसतज्ज्ञ शास्त्रज्ञ डॉ. सूर्यकांत पवार यांनी कापसावरील सेंद्रिय बोंड आळी नियंत्रणाबाबत मार्गदर्शन केले. सोबतच करावयाच्या सोयाबीन काढणीनंतर रब्बी पीक लागवडीबाबतही त्यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. यावेळी कृषितज्ज्ञ डॉ. एस. एस. माने यांनी कापसाची झालेली बोंडे सड, सेंद्रिय बोंड आळी, स्वच्छ कापूस काढणी व मार्केटिंगबाबत माहिती दिली. यावेळी डॉ. शरद कापसे, मोतीराम कदम, लक्ष्मण सवडे, राजू घोडके, प्रकाश कापसे, ज्ञानेश्वर मिसाळ, पंढरीनाथ पालोदे, भगवान बनकर, सखाराम कापसे, जानकीराम सूर्यवंशी, संतोष बोर्डे, देविदास कापसे, सुनील बनकर यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती. शिवारफेरीमध्ये परिसरतील अनेक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.